# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२४/०६/२०१६.

**१) जुन्या वादावरून जिवाने मारण्याच्या उद्देशाने गंभीर जखमी केले:—**

दिनांक २३/०६/२०१६ रोजी १०.०० वा. दरम्यान फिर्यादी श्रीमती यशोधा चमरू पचारे वय ६० वर्ष रा. तलाव वार्ड लाखनी व मोहण चमरू पचारे वय ४२ वर्ष हे सख्खे बहिण भाऊ असुन एकाच घरी राहत होते. मोहण चमरू पचारे हा खर्रा घेण्याकरीता समोरील चौका मध्ये जाण्यास निघाला तेव्हा फिर्यादीचा चुलत भाऊ आरोपी हा त्याच्या घराकडुन हातामध्ये बासाची काठी घेवुन आला व ६ महीण्यापुर्वी झालेल्या जुण्या वादाच्या कारणावरून जिवाने मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या भावाला डोक्यावर, कमरेवर व पाठीवर काठीने मारून गंभिर जखमी केले. त्यामुळे मोहण हा जागीच बेशुध्द होवुन खाली जमीनीवर पडला. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. अभिप्राय वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोनी. चकाटे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) ट्रकची कंटेनर ला धडक, दोन जखमी . :—**

दिनांक २२/०६/०१६ रोजी २३.४५ वा. दरम्यान आरोपी ट्रक क्र. एमएच ३१ एपी २८८३ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवुन पेट्रोलपंप ठाणा एनएच ६ रोडच्या बाजुला उभा असलेला कंटेनर क्र. एमएच ४० वाय १५६९ ला मागुन धडक दिली, त्यामुळे ट्रकमध्ये बसलेले फिर्यादी विक्की विनायक लिल्हारे वय २७ वर्ष रा. वाटोळा जि. नागपुर तसेच अनील बेहरे यांना जखमी करण्यास कारणीभुत झाला. असे जखमी फिर्यादीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) ट्रकची स्कुटीला धडक,तिन जखमी. :—**

दिनांक २३/०६/०१६ रोजी १०.३० वा. दरम्यान फिर्यादी फैज रहमानी मोहम्मद अली वय २५ वर्ष रा. भाईतलाव वार्ड पवनी हा स्कुटी मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ९७८६ वर सोबत रिना निमजे रा. जवाहरनगर हिला मागे बसवुन मो.सा सुरु करीत असतांना आरोपी ट्रक क्र. एमएच ४० वाय २७५६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला जवाहरगेट पवनी जवळ मागुन धडक देवुन फिर्यादी व त्याच्या सोबत असलेली रिना व रोडने जाणारी १ महिला हिला जखमी करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–

दिनांक २३/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे., तुमसर, साकोली, दिघोरी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर हातभट्टी दारू कि. ४५००/–रू. तसेच जुगारातुन कि. १२५/–रू. असा एकुण कि. ४६२५/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.